'मनोगत आणि नाटयसंगीत' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. रसिकांनी त्याला उदंड प्रतिसाद दिला. त्यानंतर रात्रौ ८.०० वा. निमित्त निर्मीत, विद्या चितळे, मधुगंधा कुलकर्णी आणि दीपक करंजीकर यांच्या प्रमुख भूमिका असलेले 'त्या एका वळणावर' हे नाटक सादर करण्यात आले.

कै. शंकरबापू आपेगावकर रंगमंचावर दुपारी तीन वाजता संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत यांच्या हस्ते एकपात्री कार्यक्रमाचा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला. त्यानंतर 'श्यामची आई', 'क्रांतीचा साक्षीदार', 'बोट न लावता गुदगुल्या', 'हास्यदरबार', 'स्त्री विविधा', 'हास्य यात्रा', 'हास्यरंजन', 'व्यंगचित्रकार', 'मी अत्रे बोलतोय', 'गम्मत कर! गम मत कर!' 'हास्यनगरी', 'शिवप्रताप', 'हास्यसम्राट', 'हास्याचा खळखळाट', 'अस्सल माणसं इरसाल नमुने', 'हास्य गडगडाट' हे एकपात्री कार्यक्रम सादर झाले.

नाटय परिषद बीड शाखेची 'आम्ही नाटक करीत आहेत', पंचमवेद बालरंगभूमी, औरंगाबाद यांचे 'भारत भाग्यविधाता', विद्या व्हॉली स्कूल पुणे यांचे 'इमारत आणि झोपडी' सांगली शाखेचे 'क्रांतीसूर्य' ही बालनाटये सादर करण्यात आली. त्यानंतर बीड शाखेची 'लिंपन', एस.बी.इ.एस. कॉलेज औरंगाबाद यांची 'भय इथले संपत नाही' या एकांकिका सादर करण्यात आल्या.

## दि. १५ फेब्रुवारी २००९

कै. आद्यकवी मुकुंदराव रंगमंचावर 'संगीत शारदाचं घडलंय ते बिघडलय' या पुणे शाखेच्या वगनाटयाने संमेलनाच्या दुस-या दिवसाची सुरूवात करण्यात आली. त्यानंतर ई.टी.व्ही. मराठी प्रस्तुत 'कॉमेडी एक्सप्रेस', आनंदी विकास नांदेड याचा 'गाणी ऋतू वेल्हाळ' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दुपारी चार वाजता ''संगीत रंगभूमी आधुनिक काळानुसार बदलता येईल का?' या परिसंवादाच्या कार्यक्रमानंतर 'सोंगी भारूड' हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

कै. राम मुकादम रंगमंचावर दक्षिण मध्य विभागीय सांस्कृतिक केंद्र नागपूर, सांस्कृतिक कार्य संचालनालय महाराष्ट्र शासन आणि अखिल भारतीय मराठी नाटय परिषद आयोजित प्रायोगिक नाटय महोत्सव संपन्न झाला. या महोत्सवात मु.जे. विद्यालय, जळगाव यांची 'नाना भोळे बारा शनि पेठ', ओमकार आर्टस्, मुंबई 'घे धस्का', रूपारेल कॉलेज, मुंबई यांची 'लॉगीन आऊट', अभिनय, कल्याण यांची 'ऐनिग्मा', कलारंग, अलिबाग यांची 'समझ जाव', सेंट उर्सिजा महाविद्यालय, नागपूर याची 'ताई', मितीचार, कल्याण यांची 'तू मी इत्यादि', नाटयरंग,